## राज्याचा खरीप हंगाम २०२०-२० हवामान, पीक पेरणी व पीक परिस्थितीचा अहवाल दि.२१-९-२०२० अखेर

**हवामान व पर्जन्यमान** : राज्यात दि.११ ,जून २०२० रोजी मान्सूनचे आगमन झाले. दि.१६ जून ,२०२० पर्यंत मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापला. राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते. बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागात तुरळक ठिकाणी जोरदार तर ठाणे, पुणे व लातूर विभागात तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**पर्जन्यमान (२०२०)**

दि.१ जून ते २१ सप्टेंबर कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस ९५०.३ मि.मी. असून दि.२१ सप्टेंबर, २०२० पर्यंत १०२७.४ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या १०८.१ टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.२१.०९.२०१९ अखेर ११३०.८ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ११९.० टक्के पाऊस झाला.

राज्यात दि.१ जून ते २१ सप्टेंबर, २०२० अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | --- |
| २ | २५ ते ५० % | ० | --- |
| ३ | ५० ते ७५ % | ०१ | नंदुरबार. |
| ४ | ७५ ते १०० % | १० | ठाणे, रायगड, नाशिक, पुणे, कोल्हापूर, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | २३ | रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, धुळे, जळगांव, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा, वाशिम, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली. |

राज्यात दि.२१ सप्टेंबर, २०२० अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकुण ३५५ तालूक्यांपैकी २ तालूक्यांत २५ ते ५० %, २४ तालूक्यात ५० ते ७५ %, ८६ तालूक्यात ७५ ते १००% तर २४३ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**पर्जन्यमान तपशिल (मि.मी) दि.२१.०९.२०२० अखेर**



**किड व रोग-**

राज्यात काही ठिकाणी ज्वारी व मका पिकावर लष्करी अळीचा, भात पिकावर निळे भुंगेरे व पिवळ्या खोडकिडीचा, भुईमूग पिकावर हुमणीचा, सोयाबीन पिकावर गर्डल बीटल, उंट अळी, खोडमाशी व तंबाखुवरील पाने खाणाऱ्या अळीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा व पानांवरील ठिपक्यांचा प्रादुर्भाव दिसून आला.

दि.१८.०९.२०२० अखेरच्या प्राथमिक अहवालानुसार किड/रोगाचा प्रादुर्भाव होऊन मूग, उडीद, सोयाबीन व संत्रा/मोसंबी या पिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये मूग-५०,४०३ हे., उडीद-१६,३३८ हे., सोयाबीन-१,६२,१६९ हे. व संत्रा/मोसंबी-७,६४१ हे. क्षेत्र बाधित झाले आहे. याशिवाय माहे, ऑगस्ट-२०२० व सप्टेबर २०२० मध्ये अतिवृष्टी / वादळी वारे व पुरामुळे बाधित झालेल्या क्षेत्राच्या प्राथमिक अहवालानुसार १४ जिल्हयातील १,६४,५१८ हे., क्षेत्र बाधित झाले आहे. यामध्ये भात, भुईमूग, सोयाबीन, तूर, कापूस, ज्वारी, बाजरी, हळद, ऊस, मका, केळी, डाळींब,भाजीपाला इ. पिकांचा समावेश आहे.

**खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी -**

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४१.९८ लाख हेक्टर असून दि.२१ सप्टेंबर, २०२० अखेर १४३.६४ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०१.१७%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५१.३३ लाख हेक्टर असून १४४.८९ लाख हेक्टर क्षेत्रावर (९५.७५%) पेरणी/लागवड झाली आहे. मागील वर्षी दि.२०.०९.२०१९ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील ऊस पिकासह पेरणी क्षेत्र १४०.९४ लाख हे. (९७.२७%) तर ऊस पिक वगळून पेरणी क्षेत्र १३९.६८ लाख हे. (९७.२४%) होते.

**खरीप हंगाम २०२०-२१ पिक परिस्थिती -**

राज्यात भात पिक फुटवे फुटणे, फुलोरा तर काही ठिकाणी दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. नागली पिके वाढ ते फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहेत. बाजरी पिक पोटरी ते फुलोरा तर काही ठिकाणी दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून काढणी सुरू आहे. मूग व उडिद पिके शेंगा भरणेच्या ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून काढणी प्रगतीपथावर आहे. सोयाबीन व भुईमूग पिके फुलोरा, शेंगा लागणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. कापूस पिक पाते धरणे ,फुले लागणे ते बोंडे लागण्याच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक पोटरी, फुलोरा अवस्थेत तर काही ठिकाणी दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. सुर्यफुल पिक फुलोरा तर काही ठिकाणी दाणे भरण्याच्या अवस्थेत आहे. मका फुलोरा, दाणे भरण्याच्या तर काही ठिकाणी दाणे पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीस सुरुवात झाली आहे. तूर पिक फांद्या फुटणेच्या तर काही ठिकाणी फुलोऱ्याच्या अवस्थेत आहे.

**खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील राज्यस्तरिय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी (दि.२१.०९.२०२० अखेर)**



## खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता




## खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील विभागनिहाय पेरणी क्षेत्राचा तुलनात्मक तक्ता (ऊस पिकासह) (क्षेत्र लाख हे.)




## विभागनिहाय पिक परिस्थिती

### कोकण विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. आद्रतेच्या प्रमाणात व तापमानामध्ये वाढ झाली आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाचा तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.४२ लाख हेक्टर असून दि.२१ सप्टेंबर, २०२० अखेर ३.९३ लाख हेक्टर क्षेत्रावर (८८.९१%) पेरणी झाली आहे. विभागात हळवे व निम गरवे भात पिक निसवण्याच्या ते फुलोऱ्याच्या

अवस्थेत तर गरवे भात पिक पोटरी ते निसवणेच्या अवस्थेत आहे. नाचणी पिक वाढीच्या ते फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. कडधान्ये व तेलबिया पिके वाढ ते फुलोरा अवस्थेत आहेत.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी भात पिकावर गादमाशी व निळे भुंगेरे या किडींचा प्रादुर्भाव आढळून आलेला आहे. किड नियंत्रणासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापनाबाबत जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे.

## नाशिक विभाग

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. हवामान दमट होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाचा तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २१.१९ लाख हेक्टर असून दि.२१ सप्टेंबर, २०२० अखेर २०.३७ लाख हेक्टर क्षेत्रावर (९६.१२%) पेरणी झाली आहे. विभागात तूर, भात व नागली पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. मका पिक कणसे लागणे ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक शेंगा भरणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत आहे. मूग व उडीद पिके दाणे पक्वतेच्या अवस्थेत असून काढणीची कामे सुरु आहेत. भुईमूग पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत आहे. बागायती कापूस फुले लागणे ते बोंडे धरण्याच्या अवस्थेत आहे. जिरायती कापूस पाते ते फुले लागण्याच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक दाणे भरण्याच्या अवस्थेत आहे. सुर्यफुल व कारळा पिके फुलोरा अवस्थेत आहेत. बाजरी पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. तीळ पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर खोडमाशी, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा व पानावरील ठिपके रोगाचा, मका पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

## पुणे विभाग

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाचा तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.६७ लाख हेक्टर असून दि.२१ सप्टेंबर, २०२० अखेर ११.९९ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३८.२७%) पेरणी झाली आहे. विभागात मुग व उडीद पिके शेंगा भरणेच्या ते पक्वतेच्या अवस्थेत असून काढणी प्रगतीपथावर आहे. बाजरी व मका पिके दाणे भरणेच्या तर काही ठिकाणी पक्वतेच्या अवस्थेत आहेत. भात पिक वाढ, फुटवे फुटण्याच्या अवस्थेत तर काही ठिकाणी फुलोरा अवस्थेत आहे. तूर पिक फांदया फुटणे, फुलोरा तर काही ठिकाणी शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे. भुईमूग व सोयाबीन पिके शेंगा लागणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत आहेत. कापूस पिक पाते, फुले लागणे ते बोंडे धरणेच्या अवस्थेत आहे. सुर्यफूल पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग –**

विभागात मका पिकावर लष्करी अळीचा, कापूस पिकावर रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला. तूर पिकावर पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. सुर्यफुल पिकावर पाने खाणा-या अळीचा, आडसाली ऊस पिकावर लोकरी मावा किडीचा तर भूईमूग पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला.

## कोल्हापूर विभाग

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तपमानात वाढ झाली आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.०३ लाख हेक्टर असून दि.२१ सप्टेंबर, २०२० अखेर ८.०८ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००.५८%) पेरणी झाली आहे. हळवे भात पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या तर निम गरवे व गरवे भात पिक लोंबी निसवणेच्या अवस्थेत आहे. नागली पिक वाढ ते फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक फुलोरा ते दाणे भरण्याच्या अवस्थेत आहे. मका पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या तर काही ठिकाणी दाणे पक्वतेच्या अवस्थेत आहे. बाजरी पिक दाणे भरणेच्या ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी कामे सुरु आहेत. लवकर पेरणी झालेले सोयाबीन पिकाची काढणी सुरु झाली आहे तर उर्वरीत पिक शेंगा भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. मूग, उडीद व घेवडा पिके शेंगा भरणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु आहे. भुईमूग पिक शेंगा भरणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून काढणी कामे सुरु आहेत. आडसाली ऊस फुटवेच्या अवस्थेत आहे. गळीतास जाणारा ऊस जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे. पोषक पर्जन्यमान असल्याने ऊसाची वाढ समाधानकारक आहे. मागील सप्ताहात झालेल्या पावसामुळे सातारा जिल्हयातील मूग, उडीद व बाजरी पिकाचे नुकसान झाले आहे.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी भुईमूग हुमणीचा, मका पिकावर लष्करी अळी, सोयाबीन पिकावर पानेखाणारी अळी, भात पिकावर काही ठिकाणी करपा रोगाचा व खोडकीड, पाने खाणारी अळी आणि तुडतुडे या किडींचा, ऊस पिकावर लोकरी मावा व हुमणी या किडींचा तर तांबेरा या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला.

## औरंगाबाद विभाग

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.२३ लाख हेक्टर असून दि.२१ सप्टेंबर, २०२० अखेर २०.३१ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००.४०%) पेरणी झाली आहे. विभागात बाजरी कणसे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु झाली आहे. मका पिक कणसे लागणे, दाणे भरणे तर काही ठिकाणी पक्वतेच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक शेंगा लागणे, शेंगा भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. उडीद पिकाची काढणी चालू आहे. मूग पिकाची काढणी व मळणी अंतिम टप्प्यात आहे. कापूस पिक पाते, फुले, बोंडे लागणे ते बोंडे भरणेच्या अवस्थेत आहे. भुईमूग पिक फुले लागणे, आऱ्या सुटणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. तूर पिक फांदया फुटण्याच्या अवस्थेत आहे. पिक परिस्थिती समाधानकारक आहे. पिक संरक्षणासाठी कृषि विभागामार्फत उपाययोजना सुचविण्यात येत आहेत.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर गर्डल बीटल, पाने खाणारी अळी, शेंगा पोखरणारी अळी व खोडमाशी या किडींचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा व पानावरील ठिपक्यांचा तर तूर पिकावर पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

## लातूर विभाग

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. दिवसाचे व रात्रीचे तापमान कमी होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.९४ लाख हेक्टर असून दि.२१ सप्टेंबर, २०२० अखेर २८.७३ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०२.८२%) पेरणी झाली आहे. विभागात ज्वारी व बाजरी पिके पक्वतेच्या अवस्थेत आहेत. सोयाबीन पिक शेंगा धरणे, शेंगा भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. मका पिक कणसे लागणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. मूग व उडीद पिकांची काढणी प्रगतीपथावर असून, बऱ्याच ठिकाणी काढणी पुर्ण झाली आहे. कापूस पिक पाते व फुले लागणेच्या अवस्थेत आहे. तूर पिक फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. विभागात काही ठिकाणी अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे सोयाबीन पिकातील शेंगांना कोंब फुटल्याचे आढळून येत आहे.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर पाने खाणारी अळी, खोडमाशी, उंट अळी व गर्डल बीटल, मका पिकावर लष्करी अळीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी व रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला. काही ठिकाणी पानथळ जमीनीत निचरा न झाल्याने कापूस पिकाची आकस्मिक मर दिसून येत आहे.

## अमरावती विभाग

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. दिवस व रात्रीच्या तपमानात घट झाली असून आद्रतेचे प्रमाण वाढले आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३२.२४ लाख हेक्टर असून दि.२१ सप्टेंबर, २०२० अखेर ३१.०१ लाख हेक्टर क्षेत्रावर (९६.२०%) पेरणी झाली आहे. विभागात कापूस पिक फुले लागणे ते बोंडे धरणेच्या अवस्थेत आहे. मूग व उडीद पिकांची काढणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा धरण्याच्या अवस्थेत आहे. तूर पिक वाढीच्या अवस्थेत आहे. तूर व कापूस पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत. पिक परिस्थिती समाधानकारक आहे.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी ज्वारी पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर उंट अळी, खोडमाशी व गर्डल बीटल तसेच पिवळा मोझॉक व्हायरस व मुळ कुजव्या रोगांचा, कापूस पिकावर रस शोषणाऱ्या किडींचा, गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

## नागपूर विभाग

**हवामान** - अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.२६ लाख हेक्टर असून दि.२१ सप्टेंबर, २०२० अखेर १९.२२ लाख हेक्टर क्षेत्रावर (९९.८२%) पेरणी झाली आहे. विभागात भात पिक फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. कापूस पिक फुले लागणे ते बोंडे धरणेच्या अवस्थेत तर मका पिक फुलोरा ते तुरे लागणेच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा भरणेच्या अवस्थेत आहे. तूर पिक वाढीच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक वाढ ते पोटरीच्या अवस्थेत आहे. भुईमूग पिक फुले लागणे,आऱ्या सुटणे तर काही ठिकाणी शेंगा धरणेच्या अवस्थेत आहे. विभागात सततच्या पावसामूळे पिकांवर परिणाम झाला असून सोयाबीन पीक पिवळे पडत आहेत, किडरोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे.

**किड व रोग** -

विभागात कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा, भात पिकावर पिवळी खोडकिड, पाने गुंडाळणारी अळी व गादमाशी, सोयाबीन पिकावर उंट अळी,गर्डल बीटल, व खोडमाशी किडींचा प्रादुर्भाव दिसून आला. काही ठिकाणी सोयाबीन पिकावर विषाणूजन्य रोग व मुळकूज या रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

## महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगामातील मुख्य पिकाखालील दि. २१.०९.२०२० पर्यंत पेरणी अहवाल

क्षेत्र- हेक्टरमध्ये

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (सन २०१४-१५ ते २०१८-१९) | मागिल वर्षाची पेरणी (दि.२०/०९/२०१९) | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाच्या क्षेत्राशी टक्केवारी | +/- प्रत्यक्ष पेरणी क्षेत्राची मागिल वर्षाशी तुलना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भात | १४९७४४९ | १४८१५१८ | १५१६०७८ | १०१ | १०२ | २ |
| २ | खरीप ज्वारी | ४८२४६१ | २७८९०३ | २७७३९३ | ५७ | ९९ | -१ |
| ३ | बाजरी | ६७१५९५ | ६५७९४७ | ६२४१५३ | ९३ | ९५ | -५ |
| ४ | रागी | ९४७३१ | ७७३५६ | ६९४१५ | ७३ | ९० | -१० |
| ५ | मका | ८३८०६० | ८७०७७६ | ८९२०३४ | १०६ | १०२ | २ |
| ६ | इतर तृणधान्य | ५२६६१ | ४०४४६ | ३६१३८ | ६९ | ८९ | -११ |
| | **खरीप तृणधान्य** | **३६३६९५६** | **३४०६९४५** | **३४१५२१२** | **९४** | **१००** | **०** |
| ७ | तूर | १२७५९७१ | ११९३९७९ | १२४६२७६ | ९८ | १०४ | ४ |
| ८ | मुग | ४८३३४७ | ३२८४५५ | ३९३९६८ | ८२ | १२० | २० |
| ९ | उडिद | ३५८९५३ | २९८७५९ | ३८५३०४ | १०७ | १२९ | २९ |
| १० | इतर कडधान्य | १००३२८ | ९२१२१ | १२६०३३ | १२६ | १३७ | ३७ |
| | **एकूण कडधान्य** | **२२१८५९९** | **१९१३३१३** | **२१५१५८२** | **९७** | **११२** | **१२** |
| | **एकूण अन्नधान्य** | **५८५५५५५** | **५३२०२५९** | **५५६६७९३** | **९५** | **१०५** | **५** |
| ११ | भुईमुग | १९८४३५ | १८८६४० | २०१५८९ | १०२ | १०७ | ७ |
| १२ | तीळ | २३६७२ | १०६६८ | ८९२७ | ३८ | ८४ | -१६ |
| १३ | कारळ | १९७२७ | ८२८६ | ७८७७ | ४० | ९५ | -५ |
| १४ | सुर्यफुल | १७९६५ | १३१६४ | १५००२ | ८४ | ११४ | १४ |
| १५ | सोयाबीन | ३८८४६३३ | ४०११३३० | ४३२३७०७ | १११ | १०८ | ८ |
| १६ | इतर गळीतधान्य | १३८३६ | १०७४६ | ५८७४ | ४२ | ५५ | -४५ |
| | **एकूण तेलबिया** | **४१५८२६८** | **४२४२८३४** | **४५६२९७५** | **११०** | **१०८** | **८** |
| **१७** | **कापूस** | **४१८३८०१** | **४४०५१७८** | **४२३४०६५** | **१०१** | **९६** | **-४** |
| | **एकूण पेरणी क्षेत्र** | **१४१९७६२५** | **१३९६८२७२** | **१४३६३८३४** | **१०१.१७** | **१०३** | **३** |
| **१८** | **उस (लागवडीचा)** | **९३५१७९** | **१२६१०८** | **१२५४२७** | **१३** | **९९** | **-१** |
| | **एकूण पेरणी क्षेत्र (ऊसासह)** | **१५१३२८०३** | **१४०९४३८०** | **१४४८९२६०** | **९५.७५** | **१०३** | **३** |

टिप- पेरणी क्षेत्र नजर अंदाजीत